# श्रेक

## विल्यम स्टिग

मराठी - मानसी महाजन



# श्रेक



## विल्यम स्टिग

मराठी - मानसी महाजन



त्याची आई दिसायला कुरूप होती, आणि वडीलही कुरूप होते, पण श्रेकचं दिसणं त्या दोघांच्या एकत्रित कुरुपतेहूनही वाईट होतं. रांगायला लागायच्या आधीच श्रेक नव्वद अधिक नऊ यार्ड लांब आग ओकू शकत असे, आणि दोन्ही कानातून धूर सोडू शकत असे. त्याने नुसती नजर टाकली तरी दलदलीतील प्राणी भीतीने थरथरू लागत. एखाद्या सापाला त्याला दंश करायची दुर्बुद्धी झालीच, तर क्षणार्धात तो साप आचके देऊन मारून जात असे.



एक दिवस श्रेकच्या आईवडीलांनी चर्चा करून ठरवले की आता त्यांच्या लाडक्या मुलाने बाहेरच्या जगात जाऊन स्वतःच्या हिमतीवर हाहाकार माजवायला सुरुवात करावी. त्यामुळे त्यांनी लाथ मारून त्याची बोळवण केली, आणि आपला जन्म झाला ती दलदल सोडून एकदाचा श्रेक बाहेर पडला.



अंगातून भयंकर वासाचा धूर सोडत श्रेक वेगाने रस्त्यावरून निघाला. त्याच्या वेगाला, धुराच्या वासाला घाबरून फुलं आणि झाडं त्याच्यापासून लांब लांब जायचा प्रयत्न करत होती. हे पाहून श्रेकला फार आनंद होत होता.

झाडांच्या दाटीत त्याला एक चेटकीण दिसली. टर्पेंटाइन आणि कासवाच्या रसामध्ये ती वटवाघुळं शिजवण्यात मग्न होती. ते कालवण ढवळता ढवळता ती गुणगुणत होती:

*"शिजवू वटवाघूळ, ढवळू वटवाघूळ, चाखू वटवाघूळ*
*सकाळी सकाळी खाऊ वटवाघूळ.*
*उकळू वटवाघूळ, पिऊ वटवाघूळ, चावू वटवाघूळ*
*फटफट सटसट रटरट मटमट खाऊ वटवाघूळ."*

"काय सुरेख दुर्गंध आहे!" श्रेक खिदळला. चेटकीण इतरांना घाबरवण्यात वस्ताद होती, पण श्रेकचं रूप बघितल्यावर तिलाच चक्कर आली.



चेटकीण शुद्धीवर आल्यानंतर श्रेक तिला म्हणाला, "बाईसाहेब, तुम्ही माझं भविष्य सांगितलंत, तर मी तुम्हाला माझ्याजवळच्या काही दुर्मिळ उवा देईन."
"अरे वाह!" चेटकीण खुश झाली. "सांगते ऐक!"

*"अकुशी नकुशी खाकर खाईक, चेटकीण सांगते भविष्य ऐक,*
*गाढव नेईल सरदारापाशी, युद्धात होईल तुझीच सरशी*
*राजकन्येला घालशील हार, तुझ्याहून ती कुरुप फार*
*अकुशी नकुशी खाकर खेक*
*जादूचे शब्द - सफरचंद केक!"*

"राजकन्या! काय सांगतेस!" श्रेक उत्साहाने म्हणाला. "हा मी निघालो!"





लवकरच त्याला एक शेतकरी भेटला. शेतकरी गाणं गुणगुणत पिकाची कापणी करत होता. "अरे गड्या!” श्रेकने त्याला हाक दिली. “एवढा आनंदी का आहेस?“

शेतकरी पुटपुटला:


*"गव्हाची कापणी करायची हाय*
*विचार करायला वेळच नाय.*
*मरेपातुर राखेन शेताची निगा*
*कामं लई पडलीत, तुम्ही निघायचं बघा!"*



"खेडवळ कुठला!" श्रेक दरडावला. "तुझ्या पिशवीत काय आहे?"
"तितर पक्षाचं थंड मांस आहे."
"अरे वाह! तितर पक्षाचं मांस!"
श्रेक आपल्या नजरेच्या धगीवर ते मांस गरम करू लागला. हे बघताच शेतकरी भोवळ येऊन पडला. श्रेकने गरम मांस खाल्लं आणि पुढे निघाला.



श्रेक जाईल तिकडे सर्व जीव, जंतू, पक्षी, प्राणी त्याच्यापासून लांब पळत. आपण एवढे घृणास्पद आहोत हे बघून श्रेक भारी खुश होई.






थोड्याच वेळात श्रेकच्या तापलेल्या डोक्यावर पावसाचे टपोरे थेंब पडू लागले.
"एवढा किळसवाणा प्राणी कधी पहिला आहेस का?" वीज ढगांना म्हणाली.
"कधीच नाही!" ढग कण्हला. "त्याला जरा अद्दल घडवूया."
वीज जोरात श्रेकच्या डोक्यावर कडाडली. श्रेक ने वीज तोंडात टाकून खाऊन टाकली, ढेकराबरोबर थोडा धूर सोडला आणि हसला. हे पाहून वीज, ढग आणि पाऊस, तिघांनी तिथून पळ काढला.



श्रेक उत्साहात पुढे निघाला. जंगलाच्या शेवटी एका झाडावर त्याला ही पाटी टांगलेली दिसली:

*“वाटसरू तू ताकीद ऐक*
*वाटेवर या धोके कैक!*
*हवे तुज शाबूत शिर आणि धड*
*तर परतीचा तू मार्ग पकड!”*


श्रेक अर्थातच न घाबरता बेफिकीरीने पुढे गेला.



जंगलात जाताच एका भयंकर ड्रॅगन ने श्रेकचा रस्ता अडवला. श्रेकने हसून ड्रॅगनला अभिवादन केले. ड्रॅगन ने त्याला जमिनीवर आपटले. श्रेक पडून राहिला, त्याला तर गम्मतच वाटत होती.



तापट ड्रॅगन श्रेकचे डोके धडावेगळे करणार तेवढ्यात श्रेक ने ड्रॅगनच्या डोळ्यांमधोमध कुजक्या वासाची निळी आग टाकली. बिचारा ड्रॅगन बेशुद्ध होऊन खाली पडला.



तासाभराने श्रेकचीही शुद्ध हरपली. चालता चालता वाटेतच त्याला झोप लागली. त्याच्या स्वप्नात तो फुलांच्या कुरणात होता. आजूबाजूला मुलं खेळत होती आणि पक्षी चिवचिवाट करत होते. काही मुलं श्रेकला जवळ घेत होती, त्याचे मुके घेत होती. श्रेकने कितीही प्रयत्न केला, तरी मुलं त्याच्यापासून लांब जात नव्हती.



पेंगुळलेले डोळे चोळत, लहान बाळासारखा बडबडत श्रेक जागा झाला.
"हे काही खरं नव्हतं, वाईट स्वप्न होतं...भयानक स्वप्न!"




श्रेक इकडे तिकडे भटकत होता. आपल्याला खरंच राजकन्या भेटेल का, असा विचार करत असताना त्याला समोर एक गाढव चरताना दिसलं. चेटकिणीच्या भविष्यवाणीतलं गाढव हेच तर नसेल? श्रेक घाईघाईने गाढवाजवळ गेला, आणि चेटकिणीने सांगितलेले जादूचे शब्द पुटपुटला: "सफरचंद केक!"
गाढव झोपाळलेले डोळे वर करून गाऊ लागलं:

*"पाहायला हिरवळ, चरायला हिरवळ*
*मी शोधतो कोवळी पाती.*
*पडायला हिरवळ, निजायला हिरवळ*
*खादाड खाऊ मी अती."*



"गप्पिष्ट गाढवा!" श्रेक डाफरला. "तू मला कुठेतरी घेऊन जाणार आहेस ना?"
" हो. सरफिऱ्या सरदाराकडे. जो पहारेकरी आहे. वेड्या वाड्याचा. जिथे कुरूप राजकन्या वाट बघते आहे."
"चल मग!" श्रेक किंचाळला, आणि गाढवावर टुणकन चढून बसला.



थोड्याच वेळात ते एका मोटेजवळ पोहोचले. अंगभर पोलादी कवच घातलेला सरदार पुलापाशी उभा होता. श्रेकने त्याच्या कवचावर ठकठक केले आणि विचारले: "या कवचात कोण आहे? आणि या वाड्यात कोण आहे?"
"इथे एक शूर सरदार, तिथे भीतीदायक राजकन्या" उत्तर आले.
"तीच माझी राजकन्या आहे!" श्रेक म्हणाला. "माझं तिच्याशी लग्न होणार आहे!"
"मी जिवंत असे पर्यंत होऊ शकणार नाही!" सरदार गरजला.
"तू जिवंत असे पर्यंत होऊ शकणार नाही." श्रेकने मान्य केले.



"उगाच बहादुरी दाखवू नकोस!" सरदाराने प्रतिकार केला.
"कृपा करून बाजूला हो, मला माझ्या राजकन्येकडे जाऊ दे!" श्रेकने फर्मान सोडले.
"मी तुझ्या डोक्याचे तुकडे तुकडे करून टाकेन!" असं म्हणून सरदाराने श्रेकवर जोरात वार केला.

श्रेकने डोळे वटारले, तोंड मोठे उघडले आणि आगीचा लोळ बाहेर टाकला. आगीच्या धगीमुळे लालबुंद झालेला सरदार घाणेरड्या मोटेत जाऊन पडला.




विजयी मुद्रेने श्रेकने पूल ओलांडला आणि महालात शिरला. तिथे, आयुष्यात प्रथमच, त्याला भीती काय असते ते समजले.





अवती भोवती सगळीकडे हिडीस प्राणी दिसत होते. ते बघून श्रेक इतका अस्वस्थ झाला की तो जेमतेम थोडीशीच आग ओकू शकला. त्याबरोबर सर्व हिडीस प्राण्यांनी सुद्धा श्रेकवर आग ओकली. श्रेक पळू लागला. सर्वात जवळच्या प्राण्यावर त्याने हात मारला, पण त्याच्या हाताला काचच लागली.



श्रेक आरशांच्या दालनात होता! "हे तर माझंच प्रतिबिंब आहे!" तो अत्यानंदाने ओरडला. "माझं प्रतिबिंब!" श्रेक स्वतःच्या प्रतिमेसमोर उभा राहिला. स्वतःवर अतिशय खुश होऊन तो आपले रूप न्याहाळू लागला. आपण एवढे हिडीस दिसतो याचा त्याला खूप गर्व वाटत होता.



त्याच धुंदीत तो आत गेला आणि आ वासून पाहतच राहिला. तिथे, त्याच्या समोर जगातली सर्वात अप्रतिम कुरूप राजकन्या उभी होती!
"सफरचंद केक!" श्रेकने उसासा सोडला.
"कॉक अ डू डूडल!" राजकन्या लाजून म्हणाली.



श्रेक म्हणाला: "लाल भडक खरूज भरलेले, तुझ्या गालावरचे काटेरी फोड..... तुझी गिळगिळीत आणि दुर्गंधी युक्त कांती....यावर मी फिदा आहे!"
राजकन्या म्हणाली: "तुझे ढेकळासारखे नाक, टोकदार डोके, क्रूर लाल डोळे.....यावर मी फिदा आहे!"

श्रेक म्हणाला:

*"निळ्या ओठांची भीषण राणी*
*लाल डोळ्यांची तू काणी*
*तुझ्या कुरुपतेवर कुर्बान झालो*
*जवळ तुझ्या मी धावून आलो."*



राजकन्या म्हणाली:

*"मनासारखा हिडीस कुमार*
*आवडला तू मजला फार*
*नकोस थांबू, वेळ न दवडू*
*घालू एकमेका हार"*



श्रेकने राजकुमारीचं नाक चावलं. राजकुमारीने त्याचे कान कुरतडले. एकमेकांना ओरबाडत, मारत ते एकमेकांच्या मिठीत आले.



लवकरात लवकर त्यांनी लग्न केलं, आणि त्यानंतर दोघे भेटणाऱ्या सर्वांना घाबरवत, धमकावत भयानकपणे राहू लागले. .